# ज्ञानसागर कोचिंग क्लासेस, अहमदनगर

## घटक चाचणी परीक्षा

| | | |
|---|---|---|
| इयत्ता – ९ वी | गद्य – ३ व ४, पद्य –१ व २ | वेळ –१ तास |
| विषय – मराठी | | गुण – २० |

**प्र.१ अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १० ते १२ ओळींत लिहा.** ५

१) दिवाकरांनी 'असे केल्याशिवाय जगात भागत नाही' या नाटयछटेत खुशामतखोरपणाची खिल्ली कशी उडविली आहे?

२) प्रसेनजीत राजा व भगवंत यांच्या भेटीत काय चर्चा झाली?

३) 'स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास' असे संत जनाबाई का म्हणतात?

४) गुरूचा महिमा सांगतांना कवीने कोणकोणती उदाहरणे दिली आहेत?

**ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६ ते ८ ओळींत लिहा.** ६

१) संत निर्मळाच्या मुक्तीचे वर्णन सोयराबाईनी कोणत्या शब्दांत केले आहे?

२) संत तुकारामांनी परमेश्वराकडे कोणती मागणी केली आहे?

३) वारकरी संप्रदायातील संत तुकारामांच्या कार्याचे वेगळेपण बहिणाबाईंनी कसे दाखविले आहे?

४) भगवंतांची अंगुलीमालाशी भेट झाल्यावर ते त्याला काय म्हणाले?

**प्र.२ अ) खालीलपैकी कोणत्याही दोन ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.** ६

१) 'अहो रूपम्, अहो ध्वनि:'

२) 'संतांचे घरची दासी मी अंकिली । विठोबाने दिली प्रेमकळा ॥'

३) 'सोयरा देखोनी आनंदली । वेळोवेळां विठू न्याहाळी ।'

**ब) खालीलपैकी तीन प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.** ३

१) कुत्र्याने कोणाची झोळी पळवली होती?

२) राजाच्या अधिक बोलण्यामुळे कोणता तोटा होतो?

३) संत ज्ञानेश्वरांना कोणाच्या भेटीची ओढ लागली आहे?

४) आउसाने कुत्र्याला मारल्यावर कोणी श्रीमुगुट धरला?

**क) खालीलपैकी कोणत्याही एका अलंकाराची लक्षणे सांगून उदाहरण द्या.** २

१) अनुप्रास

२) उपमा

*****

ज्ञानसागर अहमदनगर